# भा.कृ.सं.प.-राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र

पत्ता - एन.एच. 65, सोलापूर-पुणे हायवे, केगांव,
सोलापूर, महाराष्ट्र -413255
दूरध्वनी: 2354330, 2350074, 2350263, Fax: 0217-2353533, 0217-2350262 (संचालक)
ई-मेल:nrcpomegranate@gmail.com, director@nrcpomegranate.org
rkrishnapal@gmail.com contact@nrcpomegranate.org
संकेत स्थळ:www.nrcpomegranate.org
(ISO 9001:2008 Certified Institute)


## पावसाच्या पडलेल्या खंडामुळे उद्‌भविलेल्या परिस्थितीत डाळिंबाचे आपत्कालीन व्यवस्थापन सल्ला :

**अ) शेतातील ओलाव्याचे संवर्धन करणे**

- ***भर घालणे*** : झाडाच्या खोडाभोवती 10-12 इंच उंचीचे आणि 35-40 इंच रूंदीचे (1 मी.) गादी वाफे तयार करणे.
- ***आच्छादने*** : सेंद्रीय आच्छादन म्हणून डाळवर्गीय पिकांचे अवशेष किंवा उसाचे पाचट यांचा उपयोग करणे.
- ***आंतर पिके*** : आंतर पिक म्हणून मटकी, मुग, धैंचा, ताग या सारखी कमी उंचीची व कमी पाणी शोषणाऱ्या पिकांची पेरणी करावी . हयापैकी योग्य पिकाची पेरणी ही डाळिंबातील रोग व किडींचा प्रादुर्भाव विचारातुन घेऊन करावी, जेणेकरुन वाया जाणारे पाणी उपयोगात आणुन मुख्य पिकाच्या उत्पान्नातील तुट भरून काढता येईल.
- ***तणे*** : किटकनाशके फवारणीतुन किड व्यवस्थापन करुन, तणांचा उपयोग हिरवळीचं आच्छादन म्हणून करुन घेण्यासाठी झाडाच्या वाफ्यातील तण काढणे टाळावे.

**ब) जमिनीतील पाण्याचे संवर्धन**

- शेतीतील कुपनलिका पाण्याची गरज असेल तेव्हाच वापराव्यात.

**क) झाडाचा घेर /पिक/पाणी व्यवस्थापन**

- ***विश्राम अवस्थेतील बाग*** : झाडाला फक्त जगवण्या इतकेच पाणी दयावे व आवश्यक तेवढीच पाने ठेवण्यासाठी झाडांची छाटणी करावी.
- ***20-30 दिवसांत फळ तोडणीसाठी असलेली बाग*** : झाडांना,फळांचा भार,मृदेचा प्रकार आणि हवामान या प्रमाणे गरजेनुसार कमीत कमी पाणी दयावे. झाडांवरिल फळ नसलेल्या फांदया, पान फुटवे काढवेत.
- ***बहार घेतलेली बाग*** : झाडांवर फळांचा अतिभार ठेवू नये (विरळणी करावी) आणि दर 15 दिवसानंतर दिसुन येणारी पानफुटवे काढावित. फळांचा हा भार झाडाची वाढ व घेर विचारात घेवूनच ठेवावा. सामान्य वातावरणात फळांचा मध्यम भार ठेवण्यासाठी खाली दिलेल्या तक्त्याचा उपयोग करावा.जेव्हा पाऊस नसेल तेव्हा बागेस पाणी दयावे.

**सामान्य वातावरणात फळांची मध्यम संख्या**

| अ.क्र | झाडाचे वय (वर्षे) | प्रतिझाड फळांची संख्या |
|---|---|---|
| 1 | 2 | 20-25 |
| 2 | 3 | 35-45 |
| 3 | 4 | 50-80 |
| 4 | 5 वर्षा पुढील | 85-100 |

### ड) खतांचा वापर

पुरेश्या पाण्या अभावी अर्धवट विरघळल्यामुळे खतांचे उपयोग होत नाही व ती वाया जातात म्हणून खतांचा वापर कमी करावा.अशा परिस्थितीत फर्टिगेशन (विद्राव्य खते देणे) अधिक फायदयाचे राहील.

### ई) रोग व किडींचे व्यवस्थापन

कमी पाऊस असेल परंतु रोग व किडीस पोषक तापमान (25-30° सें) उच्च आर्द्रता (50% पेक्षा जास्त) आणि काही भागात जर अधुनमधुन रिमझिम पाऊ स असेल तर, असे वातावरण तेलकट डाग, मर रोग, ॲन्थ्रॅक्नोस आणि कोलेटोट्रिकम युक्त फळ कुज, फायटोप्थोरा ब्लाईट आणि इतर बुरशीजन्य ठिपके व व कुजवा यांच्या वाढीस पोषक असते. कोवळया पाने फुटीवर फुलकीड, पाने खाणारी अळी, फळअळी आणि रस शोषणारा पतंग आदींचा प्रादुर्भाव वाढतो; म्हणून अशा परिस्थितीत प्रादुर्भाव कमी करण्यासाठी योग्य उपाय योजना कराव्यात किड व रोगांच्या व्यवस्थापनासाठी शेतकरी बांधवांनी रा.डा.सं.कें, ने शिफरास केलेल्या मृग बहार पिकासाठी असलेले फवारणी वेळापत्रकाचा अवलंब करावा. (हे वेळापत्रक www.nrcpomegranate.org हया संकेत स्थळावर इंग्रजी व मराठी भाषेत उपलब्ध आहे.) अधिक माहीतीसाठी संपर्क साधा - 0217-2350074